# मूल्यहिन व्यवस्थेच्या विरोधात मूल्य जोपासणाऱ्यांचा संघर्ष म्हणजे : 'तहान'

**संदीप भुजंग शेकडे,** डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
भ्रमनध्वनी – ७९७२२९१३६३ sandeep.shekade2011@gmail.com

---

प्रस्तावना :-

मराठी कादंबरी वाङमयामध्ये १९८० नंतर जोमाने कादंबरी निर्मिती झालेली दिसते. या कालखंडातील कादंबरी लेखन हे उत्तम दर्जाचे आहे. यंत्र, युग आणि त्यामुळे निर्माण झालेल्या नव्या समस्यांचे दर्शन या काळातील कादंबरीने वास्तवाच्या पातळीवरुन घडवले आहे. नव्या युगाचा चैतन्यमय आविष्कार या काळातील कादंबरीतून साकारतो.

ग्रामीण कादंबरीचा विचार करायचा झाल्यास विश्वास पाटील, सदानंद देशमुख, राजन गवस, प्रतिमा इंगोले, मथु सावंत यांच्यासारख्या अनेक लेखकांनी मराठीतील ग्रामीण कादंबरीचे दालन समृद्ध केले. या ग्रामीण कादंबरांनी जागतिकीकरण, उदारीकरण, धर्मांधता, जातीयवाद, वंशवाद या सर्वांचे ग्रामीण समाजातील वास्तवरुप अतिशय बारकाव्यांसह मांडलेले आहे. १९८० नंतरची मराठी ग्रामीण कादंबरी समकालीन जीवन जाणिवांना, समस्यांना आणि प्रश्नांना वस्तूनिष्ठपणे अविष्कृत करते. या काळातील ग्रामीण कादंबरी लेखनाच्या कक्षा या विस्तारित झालेल्या आहेत, हे आपणांस लक्षात येते. सामान्य माणसांच्या जीवनाशी निगडित असंख्य प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न या काळातील कादंबरीने केलेला आहे. यातीलच एक समस्या म्हणजे पाणी प्रश्न, तो सदानंद देशमुख यांनी आपल्या 'तहान' या कादंबरीच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**मूल्यहिन व्यवस्थेच्या विरोधात मूल्य जोपासणाऱ्यांचा संघर्ष म्हणजे : 'तहान'**

'तहान' ही सदानंद देशमुख यांची पहिलीच कादंबरी होय. ही कादंबरी १९९८ साली प्रकाशित झाली. 'तहान' या कादंबरीमुळे सदानंद देशमुख यांची केवळ कादंबरीकार म्हणूनच नाही तर चांगले साहित्यकार म्हणून ओळख निर्माण झाली. देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष उलटली तरी ग्रामीण भागातील खेडी-पाडी अजून तहानलेलीच आहेत, पाण्यासाठी वनवन भटकत आहेत. त्यांची ही तहान न प्रशासनाला दिसत आहे ना राजकारण्यांना. हा आशय या कादंबरीच्या माध्यमातून सदानंद देशमुख यांनी फार समर्थपणे मांडला आहे. पाण्यासाठी तळमळणारा ग्रामीण भाग हे या कादंबरीचे सूत्र आहे. मूल्यहिन व्यवस्थेच्या विरोधात मूल्ये जोपासणाऱ्यांचा संघर्ष म्हणजे 'तहान' होय. एकाच गावच्या छोट्या कॅनव्हासवर उलगडणारी पण सगळ्या रंगांच्या छटा वाचकाच्या मनावर बिंबवणारी एक अतिशय साध्या ग्रामीण भागातील चौकोनी कुणबी कुटुंबाच्या अवती-भोवती फिरणारी ही कथा.

राघोजी शेवाळे नावाचा शेतकरी या कादंबरीचा नायक आहे. ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबाची करुण कहानी लेखकाने या कादंबरीत सांगीतली आहे. सर्वच स्तरावर शेतकऱ्यांचे होणारे शोषण, दोन पिढ्यातील विचार भिन्नतेमुळे होणारा संघर्ष, वाढत्या लोकसंख्येमुळे अपुरी पडणारी साधन संपत्ती, मतलबी राजकारण आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे परस्पर मतभेदांमुळे उद्ध्वस्त होणारी कुटुंब संस्था यांचे प्रत्ययकारी चित्रण 'तहान' या कादंबरीमध्ये सदानंद देशमुख यांनी केले आहे. मानवी जीवनात 'पाणी' या घटकाचे स्थान अनन्यसाधारण आहे. शेतकऱ्याचे सर्व जीवनच पाण्यावर अवलंबून आहे. पण निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकरी

अनेकदा नागवला जातो. पाण्यासाठी होणारा आक्रोश या कादंबरीत प्रधान आहे. ग्रामीण जीवनाचे घटक असणारे शेततळे, गुरे, विहीर यांसारख्या घटकांना सदानंद देशमुख यांनी प्रसंगरुपाने जीवंत केले आहे. या कादंबरीच्या लेखनासाठी त्यांनी प्रादेशिक बोली भाषेचा वापर केलेला आहे. ही भाषा कुठेही आपली ग्रामीण बोली पोत सोडत नाही हे लेखकाचं वैशिष्ट्य आहे. त्यामुळे पूर्ण कथा एकसंध असल्याचे जाणवते. आपल्या कादंबरी लेखनाच्या प्रेरणेविषयी ते म्हणतात की, ''मूल्यहीन समाजव्यवस्थेत आपली जीवनमूल्ये जोपासणाऱ्यांना एक अटळ संघर्ष सध्याच्या विघटन काळात करावा लागत आहे. त्याचा हा संघर्ष जसा वर्तमान भयावह परिस्थितीशी आहे तसाच तो भौतिक सुखाच्या मायावी मृगजळामागे धावून महाकाय शून्य हाती येणाऱ्या सैरभैर मनोवृत्तीच्या तरुण पिढीशी सुद्धा आहे. त्यातून त्यांच्या वाट्याला येणारा ताण, त्याची घुसमट करुन गुदमरुन टाकणारा आहे. अशा तणावग्रस्त अवस्थेत जगणारी राघोजी शेवाळेची व्यक्तिरेखा मला अस्वस्थ करुन गेली आणि ही कादंबरी आकाराला आली. 'तहान' कादंबरीत सदानंद देशमुख यांनी पाणी टंचाईच्या वास्तव समस्येचे चित्रण केले आहे. सदानंद देशमुखांनी ग्रामीण जीवनातील बदलांना केंद्रस्थानी ठेवून लेखन केल्याने ग्रामीण जीवनातील विविधांगी चित्रण करणारे त्याचे लेखन लौकिकास पात्र ठरते.

ग्रामीण भागातील भीषण पाणीटंचाईचे चित्रण 'तहान' या कादंबरीतून सदानंद देशमुख यांनी केले आहे. ग्रामीण माणसांच्या जीवनातील जिव्हाळ्याचा असणारा पाण्याचा प्रश्न कादंबरीकाराने यशस्वीपणे हाताळला आहे. सामान्य माणसांना जगण्यासाठी करावी लागणारी धडपड अत्यंत भयावह आहे. या धडपडीचा सुक्ष्म वेध कादंबरीकार घेतात. पावसाच्या अनियमीतपणामुळे सारंगपूर सारखी असंख्य गावे ग्रामीण भागात तहानेने व्याकूळ झालेली आहेत. या गावांचे प्रातिनिधिक स्वरुप म्हणजे सारंगपूर हे गाव होय. या सारंगपूरची जीवघेणी व्यथा कादंबरीकारांनी मुखर केली आहे. पाण्याशिवाय मानवी जीवनच नव्हे तर कोणतेच जीवन अस्तित्वात राहू शकत नाही. त्याच पाण्याच्या शोधात दिवसरात्र धावपळ करणारे व्यथित गाव आणि त्या गावाची वेदना सदानंद देशमुखांनी नेमकेपणाने मांडली आहे. पाण्यासाठी दाही दिशा होऊन फिरणाऱ्या गावाची कहानी वाचकाला आवाक करुन टाकणारी आहे.

पाण्यासाठी करावी लागणारी कसरत जीवघेणी आहे. पाण्याच्या दुर्भिक्षाचे चित्रण करतांना कादंबरीकार म्हणतात - ''गोंधणी जवळचा हातपंप जेव्हा दहा वेळा खालीवर करावा तेव्हा त्यातून चुळकाभर पाणी खाली सांडायचं. त्याच्यानं तोटीच्या खाली भांड भरायला बराच वेळ लागायचा'' असे भीषण स्वरुप या गावातील पाणी प्रश्नाने घेतलेले आहे. त्यामुळे पाण्यासाठी होणारी जीवघेणी हेळसांड माणसाला संघर्षासाठी प्रवृत्त करताना दिसते. पाण्यासाठी स्त्रियांमध्ये आप-आपसांत होणाऱ्या तक्रारी टोकाच्या होऊन जातात. गावातील बहुसंख्य समुदायाला पाण्यासाठी हाल-अपेष्टा सहन करताना प्रसंगी जीवसुद्धा गमावण्याची वेळ येते. यातून माणसा-माणसातील नातेसंबंधांवर निराशेचे सावट आलेले दिसते. अशा असंख्य जीवघेण्या प्रसंगाचे वास्तवदर्शी चित्रण सदानंद देशमुख यांनी मोठ्या आत्मियतेने या कादंबरीतून घडवलेले आहे.

दुष्काळी स्थितीमध्ये पाण्याचा व्यवसाय करुन बबन शेवाळे कमाई करतो. पाण्याच्या संकटामुळे त्रस्त झालेला नोकरदार वर्ग व हॉटेल व्यावसायिक बबनच्या पाणी विक्रीच्या धंद्यामुळे स्थिरावलेले दिसतात. या खुशित बबनला पाण्याच्या पैशांपेक्षाही आगाऊ रक्कम

बक्षिस म्हणून मिळत जाते. यामुळे त्याच्या अपेक्षाही वाढत जातात. त्याच्या घरात नवनवीन सोयी-सुविधाजन्य वस्तूंची रेलचेल वाढते. त्याची आई रामकोरही चंगळवादाकडे झुकलेली दिसते. तर बबनचे वडील राघोजी आपल्या तत्वाशी एकनिष्ठ असतात. पैशांपेक्षा ते तत्वनिष्ठेला महत्त्व देतात. असे वेगळ्या स्वरुपाचे नैतिक अधिष्ठान राघोजी शेवाळेच्या व्यक्तिरेखेतून कादंबरीकारांनी निर्माण केलेले आहे. बबन ही व्यक्तिरेखा या कादंबरीच्या मुख्य ठिकाणी असली तरी त्यापेक्षा त्याचे वडील या कादंबरीत नायकाच्या भूमिकेतून समोर येतात. बबन हा तरुण युवक असल्यामुळे पैशांच्या धुंदीत तो वाहवत जाऊन चंगळवादाकडे झुकतांना दिसतो. हातामध्ये खेळणारा पैसा व रत्नासारखी सुंदर प्रेयसी भेटल्यामुळे तो वास्तववादापासून भरकटला जातो. तो स्वत:च्या स्वार्थाला अधिक महत्त्व देतो. कालांतराने शासकीय पाणी योजना आमलांत आल्यामुळे त्याचा धंदा कमी होतो. रत्नाचे प्रकरण समोर आल्यामुळे कमावलेले पैसे हातचे निघून जातात आणि त्याच्या बकाल आयुष्याला सुरुवात होते.

राजकीय उदासिनता आणि ग्रामीण माणसांच्या वाट्याला आलेले उपेक्षित जीवन याचे समीकरण या कादंबरीतून समोर आलेले आहे. ग्रामीण माणसांकडे पाहण्याचा एक नकारात्मक दृष्टीकोनही या कादंबरीतून समोर येतो. स्वार्थी वृत्ती खेड्याच्या व एकूणच ग्रामीण विकासाच्या मार्गातील अडसर बनून राहते. गावातील काही दृष्ट्या नेतृत्वाच्या धडपडीतून गावाला पाणी भेटते पण ते पाणी संपूर्ण गावाची तहान भागवू शकत नाही ही शोकात्म जाणीव या कादंबरीतून समोर आलेली आहे. गावातील नोकरदार, व्यावसायिक व पुढारी यांच्या घरी जाणारे अधिकचे पाणी ग्रामीण भ्रष्टाचाराचे वास्तवदर्शी उदाहरण ठरते. शेवाळेच्या वाट्याला आलेला लंगडेपणा आणि बैलाची झालेली दुर्दशा राघोजीला स्वस्त बसू देत नाही. ही राघोजीची उद्विग्नता म्हणजे कादंबरीकारांनी उभा केलेला आदर्शवाद होय. ग्रामीण भागामध्ये तत्वनिष्ठता पराजयाचा सामना करतांना दिसते पण हाती काहीच नसल्यामुळे केवळ बघत बसावे लागते. आपल्या देशात स्वातंत्र्याची सत्तरी उलटूनही अजून भयाण वास्तव फेर धरुन आहे याची जाणीव या कादंबरीतून गडद होत राहते. ग्रामीण भागातील आजचे हे वास्तव अनुभवण्यासाठी ‘तहान’ ही मुळातून वाचावी अशी साहित्यकृती आहे.

संदर्भ सूची :-

१) देशमुख सदानंद, तहान, कॉन्टिनेन्ट प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती १९९८.

२) देशमुख सदानंद भूमीचं वाङ्‌मयीन प्ररण, पद्मगंधा प्रकाशन, दिवाळी अंक वर्ष २०१४.